# विद्यार्थ्यांचे समुपदेशन – काळाची गरज

**डॉ. कल्पना राऊत (शिंदे)**
एस. जी. बी. महिला महाविद्यालय,
तुमसर जि. भंडारा

---

***सारांश :***

*आजच्या स्पर्धात्मक जगात समाज व पालक आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादत आहेत. पालकांनी घेतलेला निर्णय मुलांनी मान्य करावाच अशी अपेक्षा असते. करिअर निवडतांनाही मुलांच्या आवडीचा विचार न केल्यामुळे करिअरच्या चुकीच्या दिशा निवडल्या जातात. यामुळेच विद्यार्थ्यांचा मनात गोंधळ निर्माण होऊन घेतलेल्या निर्णयामुळे पुढे जाऊन अपयश हाती येते. यातूनच डिप्रेशन, फ्रस्टेशन, मानसिक समस्या, आत्महत्येला मुले बळी पडतात. समाजात दिवसेंदिवस या सर्वांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. या सर्वांचा विचार प्रस्तुत शोधनिबंधात करण्यात आला आहे.*

---

**प्रस्तावना :**

'लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा' या म्हणीप्रमाणे मागील पिढीतील बऱ्याच विचारवंतांनी लिहून ठेवले आहे की, त्यांच्या बालपणातील काळ हा सर्वात चांगला होता. कसलीच काळजी नव्हती, जबाबदारी नव्हती. सर्व काही आयते मिळत होते. थोडाफार अभ्यास करायचा आणि मग नाचणे, बागडणे, खेळणे वगैरे. आजचा विद्यार्थी मात्र वयाच्या अडीच वर्षापासून शिक्षणाचे ओझे डोक्यावर पडून त्यात साफ चिरडून जात आहे. अडीच वर्ष झाल्यावर सर्वप्रथम त्याला आपले स्वातंत्र्य नाहिसे झाल्याची जाणीव होते. चांगल्या शाळेत प्रवेश मिळवण्यासाठी आपल्या आईवडिलांनी केलेली खटपट आणि नंतर प्रत्येक परीक्षेत आपण जास्तीत जास्त गुण मिळवावे यासाठी केलेल्या नानातऱ्हेच्या युक्त्या आणि हे सर्व कशासाठी याची जाणीव होण्यापूर्वीच आपण कुणीतरी मोठा डॉक्टर किंवा इंजिनिअर व्हावे अशी अपेक्षा त्यांच्या कानावर पालक सतत घालत असतात. मुलांना स्वातंत्र्य नसते. आईवडील जे काही ठरवतात ती त्यांची दिनचर्या असते.

**उद्दिष्टे :**

१) विद्यार्थ्यांमध्ये वाढते नैराश्य व हार्मोनल चेन्जेस
२) विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याकडे पालकांचे दुर्लक्ष
३) पालकांच्या मुलांकडून अवास्तव अपेक्षा
४) यशस्वी करिअरच्या चुकीच्या संकल्पना

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत अभ्यास दुय्यम साधनसामुग्रीवर आधारित आहे. दुय्यम माहितीमध्ये मासिके, संशोधन लेख, अहवाल आणि इंटरनेट इत्यादी साधन साधनसामुग्रीचा समावेश आहे.

बदलत्या समाजाच्या स्वरूपाकडे व वाढत्या औद्योगिक तंत्रज्ञानामुळे विद्यार्थ्यांसमोर अनेक समस्या उभ्या आहेत. या समस्यांचे योग्यवेळी व योग्य वयात निराकरण केले नाही तर गंभीर समस्या धारण करतात. म्हणून व्यक्तीला समुपदेशनाची गरज भासते.

रॉबिन्स च्या मते – समुपदेश शब्द दोन व्यक्तीच्या संपर्काच्या त्या सर्व परीस्थितीचा समावेश करतो. ज्यामध्ये एका व्यक्तीला त्याच्या स्वत:च्या तसेच पर्यावरणामध्ये अपेक्षाकृत प्रभावी समायोजन करण्यात मदत करते.

**समुपदेशनाची आवश्यकता :**

- विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास होणे.
- अभ्यासक्रमाची योग्य निवड
- योग्य व्यवसाय व जीवनक्रम निवडण्यासाठी
- नवीन आव्हानांना सामोरे जाताना
- भावनिक अशांततेच्या व गोंधळाच्या काळात विद्यार्थ्यांना मदत करणे
- शिक्षणाच्या गुणात्मक वाढीसाठी
- राष्ट्रीय विकासासाठी
- विद्यार्थ्यांच्या उद्रेकामुळे निर्माण होणाऱ्या समस्या हाताळण्यासाठी

**पौगंडावस्थेतील वादळी काळ :**

बाल्यावस्था संपून तारूण्यावस्था किंवा प्रौढत्व सुरू होईपर्यंतच्या संक्रमण काळाला पौगंडावस्था म्हणतात. ही अवस्था मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाची असते. या अवस्थेत घडणाऱ्या गोष्टींचा परिणाम जन्मभर टिकून राहतो. मानवाच्या वाढीबरोबरच वयात येतांना काही शारीरिक बदल होतात. भिन्न लिंगी आकर्षण पौगंडावस्थेत तीव्रतेने निर्माण होते. मुले कधी आक्रमक होतात तर मुली कधीकधी आपल्या सौंदर्याविषयी जास्त चिंता करतात. विद्यार्थ्यांमध्ये या अवस्थेत विविध शारिरीक, मानसिक समस्या निर्माण होतात. या समस्येचे निराकरण करणे गरजेचे असते.

मानसिक ताण–तणाव आजकालच्या तरूणाईची सर्वात महत्त्वाची आणि वाढत असलेली समस्या आहे. १३ ते १९ वर्ष वयात घरापासून समाजापर्यंत आणि बदललेल्या भावविश्वापासून स्वत:बद्दलच्या भ्रामक कल्पनांपर्यंत अनेक गोष्टींचा प्रभाव मुलांवर असतो. नेमके याच वयात त्यांच्यावर दडपण येत असते. हे दडपण घरच्यांच्या अपेक्षांचे, प्रेमप्रकरणांचे, शिक्षणाचे, आर्थिक परिस्थितीचे असू शकते. या दडपणातून निर्माण होणारा मानसिक ताणच विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्यांना कारणीभूत आहे. या भावना असह्य झाल्याने अनेक तरूण आत्महत्या करतात. डिप्रेशन, फ्रस्ट्रेशन, बदललेले वर्तन हे सुद्धा या मानसिक समस्यांचेच परिणाम आहेत.

कुटुंब आणि समाजाच्या अवास्तव अपेक्षामुळे निराशेचे मळभ विद्यार्थी मनाभोवती साचत आहे. विद्यार्थ्यांच्या एकूणच विकासाच्या कालावधीत त्याची मानसिकता सुरक्षित राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. दहावी किंवा बारावीला कमी गुण मिळाले म्हणजे सगळे काही संपले अशी भावना विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. या कालावधीत मुलांना समजून घेण्याऐवजी पालक त्यांना दोष देतात. परिणामी मुलांचे खच्चीकरण होते. दहावी, बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांच्या आत्महत्या घडतांना दिसतात. देशात दर २२ तासाला १ आत्महत्या होत असतात. त्यामुळे हा गुणांचा आग्रह पालकांनी सोडावा. दहावी आणि बारावीतील गुणच केवळ यशाचे मापदंड नाहीत हा दृष्टिकोन विद्यार्थी मनावर सुरूवातीपासून बिंबवायला हवा. विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य जपण्यासाठी शाळांनीही लक्ष केंद्रीत करायला हवेत.

जगभरात विविध कारणांमुळे नैराश्याचे प्रमाण वाढत आहे. अमेरिकेतील ३३ हजार महाविद्यालयात केलेल्या संशोधनातून विद्यार्थ्यांमधील नैराश्य, चिंता सातत्याने वाढत असल्याचे समोर आले. अमेरिकेतील बोस्टन विद्यापीठाने हे संशोधन केले आहे. 'हेल्थी माईंड्स नेटवर्क' च्या माध्यमातून २०२० मध्ये हे ऑनलाइन सर्वेक्षण करण्यात आले. गेल्या काही महिन्यात बिघडलेल्या मनस्थितीने शैक्षणिक कामगिरीवर विपरित परिणाम झाल्याचे ८३ टक्के विद्यार्थ्यांनी सांगितले.

**करिअर निवड :**

मुलांच्या समोर करिअर निवड ज्या वयात घ्यावी लागतात तेव्हा त्यांचे वय १६ ते १८ वर्षाचे असते. त्यांच्यात मॅच्युरिटी नसते. आपल्या Education System मध्ये मुलांना त्यांची आवड Explore करायला स्कोप नाही. त्यातल्यात्यात समाजाचा (सामाजिक) आणि पालकांचा मुलांवर दबाव असतो की, जे समाजाच्या अनुसार जे चांगले व्यवसाय आहे उदा. डॉक्टर, इंजिनिअर तोच मुलांनी घ्यावा अशी एक स्ट्रॉंगली सामाजिक भावना आहे. पालक समाजाचाच भाग असल्यामुळे ते पण मुलांवरती तसाच दबाव आणतात.

सध्याची सामाजिक परिस्थिती अशी आहे की, जास्त पैसा असणे त्यालाच सक्सेस समजल्या जाते. या सामाजिक स्थिती चा प्रभाव मागच्या पिढीद्वारे कळत–नकळत नवीन पिढीवर झाला आहे. सध्याच्या स्पर्धात्मक काळात कॉर्पोरेट इंडस्ट्री मध्ये वर्कलोड जास्त असते म्हणून ज्या कर्मचाऱ्यांना निवडलेल्या कामात रूची आहे त्यांना काही समस्या नसते. परंतु जे वरील कारणाने यात आले ते एका पॉईंट नंतर Frustrated (निराश) होतात. म्हणून हा ट्रेड पाहून कॉर्पोरेट इंडस्ट्री मध्ये कर्मचाऱ्यांना त्यांच्या डेली कामाच्या परस्पर त्यांची आवड (Passion) व रूची (genuien intearest) चे कार्य करण्यास प्रोत्साहीत करतात.

समजा दिवसाला ८ तास काम असले. असे ५ दिवस काम करतो (५ x ८ = ४० तास) आठवडयाचे ४० तास तर महिन्याला १६० तास असे आपण १० महिने जरी पकडले तरी १६०० तास होतात. म्हणजेच आपण आपल्या आयुष्याचे महिन्याचे १६०० तास असे काम करण्यात घालवतो ज्याच्यात आपल्याला रस नाही. त्यामुळेच सोशल एंजायटी, डीप्रेशन, आत्मविश्वासाची कमतरता, आत्महत्या, मानसिक आजाराची जडे वरिल कारणांमुळे आहेत.

त्याकरिता विद्यार्थ्यांना फायदा होईल असे समुपदेशन त्याच वयात देणे जरूरी आहे, जेव्हा ते सगळयात चांगले मोल्ड होऊ शकतात. ते वय आहे 'किशोरावस्था' म्हणून या वयात करिअर व वैयक्तिक समुपदेशनाची अत्यंत गरज आहे. यात अडकलेल्या मुलांमध्ये जेव्हा नैसर्गिक परीपक्वता येते तेव्हा ते स्वत:ला त्यांच्या आयुष्यात अडकलेले बघतात. यातील बरेच कमी विद्यार्थी या पॉईंटला त्यांच करीअर सोडून आपल्या आवडत्या करीअर कडे शीफ्ट होतात. परंतु त्यांच्या समोर ही एक मोठी रिस्क असते. समाजामध्ये असे अनेक उदाहरण आपल्याला बघायला मिळतात.

**निष्कर्ष :**

करिअर निवडीच्या प्रक्रियेत विद्यार्थ्यांवर दबाव टाकू नये. अनेकदा पालक मुलांकडून अवास्तव अपेक्षा ठेवतात. परिणामी विद्यार्थ्यांची कारकीर्द उंचावण्याऐवजी खालावतच जाते आणि विद्यार्थी निराशेच्या गर्तेत जातो. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी करिअर निवडतांना विद्यार्थ्यांचा कल विचारात घ्यायला हवा. व्यक्तिस्वभाव, बुद्धीमत्ता, अभिरूची आणि कल यांचा समन्वय साधुन करिअरची निवड करायला हवी.

मुले आपल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठीच आहेत असा पालकांचा समज आहे. या अपेक्षा प्रामुख्याने मार्कांबाबत आणि कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे त्याबाबत. अनेक सुशिक्षित पालकही आपल्या अपेक्षांचे ओझे मुलांवर लादतांना दिसतात. त्यामुळे केवळ मुलांनाच नव्हे तर पालकांनाही समुपदेशनाची गरज आहे.

**उपाययोजना :**

१. पालक व मुलांमधील सुसंवाद वाढविणे
२. मुलांना आपल्या जीवनाची दिशा ठरविण्याचा अधिकार देणे
३. शाळेत समुपदेशनाची सोय उपलब्ध करणे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. नलिनी वराडपांडे, 'बालविकास', पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर
२. डॉ. किशोरी सुरेंद्र पै व प्रा. महेंद्र सुरेंद्र पै, 'शिक्षक विद्यार्थी व पालक परस्पर संबंध'
3- prof Dr. J. T. Kapse, create by @ mlu Aurangabad
४. दै. महाराष्ट्र टाइम्स, २२ फेब्रुवारी २०२१
५. मराठी विश्वकोश, 'किशोरावस्था'